# प्रश्नसंच - सत्र ६ पेपर ४

नाथ पंथाने कोणता भक्तिमार्ग सांगितलेला आहे?

अ. नामस्मरण
ब. सन्यास
क. हटयोग
ड. व्रतवैकल्य

'भासांमाजी चोखळ, भासा मराठी' हे मराठी भाषेबद्दलचे गौरवोद्गार कोणत्या कवीने काढले आहेत?

अ. फादर क्रुआँ
ब. फादर थॉमस स्टिफन्स
क. फादर ऍन्तोनियो सालंदास
ड. फादर फ्रान्सिस दिब्रीटो

शाहिरी काव्यात खालीलपैकी कोणते विषय आले आहेत?

अ. भक्ती व अध्यात्मविचार
ब. वीरांचे पराक्रम, शृंगार, प्रेमभावना इ.
क. समाजिक प्रश्न
ड. संत विचार

'घनःश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला' ही लावणी कोणी लिहिली आहे?

अ. राम जोशी
ब. परशराम
क. होणाजी बाळा
ड. प्रभाकर

'गोरक्षगीता' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ. अमरनाथ
ब. गोरक्षनाथ
क. गैहिणीनाथ
ड. नवनाथ

'लावणी म्हणजे व्यवस्थित, सुबक, नीटनेटकी रचना', होय हे मत कोणाचे आहे?

अ. अ. ब. कोल्हटकर
ब. म. वा. धोंड
क. वि. का. राजवाडे
ड. म. ना. अदवंत

खालीलपैकी कोणती बखर शिवचरित्रावर आधारित बखर नाही?

अ. सभासदाची बखर
ब. चित्रगुप्ताची बखर
क. श्री शिवाजा प्रताप
ड. साष्टीची बखर

खालीलपैकी कोणत्या अन्य धर्मियांनी आपल्या धर्माचा प्रचार करण्यासाठी मराठीत काव्यनिर्मिती केली?

अ. बौद्ध धर्मीय
ब. मुस्लिम धर्मीय
क.जैन धर्मीय
ड. ख्रिस्ती धर्मीय

रामदासी संप्रदायाचा प्रमुख तत्त्वग्रंथ कोणता आहे?

अ. दासबोध
ब. गुरुचरित्र
क. अमृतानुभव
ड. चतुःश्लोकी भागवत

'पोवाडा म्हणजे मराठ्यांचा काव्यमय इतिहास आणि शाहिर कवी हे तत्कालीन वृत्तपत्रकार व इतिहास लेखक होत', हे मत कोणाचे आहे?

अ. वि. का. राजवाडे
ब. म. ना. अदवंत
क. वि. ल. भोळे
ड. म. वा.धोंड

नाथ पंथाच्या तत्त्वज्ञानानुसार कोणत्या मार्गाने मोक्ष मिळतो?

अ. सहा विकारांवर नियंत्रण मिळविल्याने
ब. बारा वर्षे तपश्चर्या केल्याने
क. सगुण भक्ती केल्याने
ड. नवनाथांची भक्ती केल्याने

'मनाचे श्लोक' व 'करुणाष्टके' कोणी लिहिली आहेत?

अ. संत तुकाराम
ब. संत रामदास
क. संत बसवेश्वर
ड. संत भानुदास

'सांग सखे सुंदरी, कुण्या ग सुभगाचि मदनमंजिरी', ही शृंगारिक लावणी कोणत्या शाहिर कवीने लिहिली आहे?

अ. अनंत फंदी
ब. राम जोशी
क. सगनभाऊ
ड. होणाजी बाळा

'गोरक्षअमरनाथ संवाद' या ग्रंथातून कोणत्या पंथाचे तत्वज्ञान मांडलेले आहे?

अ. नाथ पंथ
ब. दत्त संप्रदाय
क. रामदासी संप्रदाय
ड. लिंगायत संप्रदाय

शूर मर्दांची मर्दुमकी आवेशपूर्ण भाषेत व्यक्त करणाऱ्या रचनाप्रकाराला काय म्हणतात?

अ. लावणी
ब. फटका
क. पोवाडा
ड. अर्जदास्त

लावणी व पोवाडा या काव्यप्रकारांत खालीलपैकी कोणते वैशिष्टय असत नाही?

अ. लौकिक विषय
ब. दृकश्राव्य रचनाप्रकार
क. अभिनय, नृत्य व नाट्य
ड. भक्तिरसाचा आविष्कार

खालीलपैकी कोणत्या बखरीत पानिपतावर झालेल्या युद्धाचे चित्रण आले आहे?

अ. भाऊसाहेबांची बखर
ब. सभासदाची बखर
क. पेशव्यांची बखर
ड. खर्ड्याच्या स्वारीची बखर

'ख्रिस्तपुराण' हा मराठी ग्रंथ कोणत्या लिपीत लिहिलेला आहे?

अ. देवनागरी
ब. रोमन
क. मोडी
ड. ब्राह्मी

फादर थॉमस स्टिफन्स यांनी खालीलपैकी कोणता ग्रंथ लिहिला आहे?

अ. ख्रिस्तपुराण
ब. महापुराण
क.सेंट ऍन्तोनियोची जीवितगाथा
ड. वानवळयाचो मळो

खालीलपैकी कोणती बखर शिवपूर्वकाळात लिहिलेली आहे?

अ. महिकावतीची बखर
ब. सभासदाची बखर
क. चित्रगुप्ताची बखर
ड. पेशव्यांची बखर

'आधी प्रपंच करावा नेटका, मग परमार्थ विवेका' हा उपदेश कोणत्या भक्ती संप्रदायाने दिलेला आहे?

अ. महानुभाव पंथ
ब. नाथ पंथ
क. रामदासी पंथ
ड. दत्त संप्रदाय

'अंधार नगरी, बेबंद राजा, न्यायनीती कैसी', उत्तर पेशवाईतील अंदाधुंदीचे वर्णन करणारी ही लावणी कोणी लिहिली आहे?

अ. प्रभाकर
ब. अनंत फंदी
क. परशराम
ड. होणाजी बाळा

'बैठकीची लावणी' हा लावणीचा प्रकार कोणत्या शाहिर कवीने रूढ केला?

अ. होणाजी बाळा
ब. सगनभाऊ
क. राम जोशी
ड. परशराम

कोणत्या शाहिर कवीने 'मुंबईची लावणी' लिहिली आहे?

अ. पठ्ठे बापूराव
ब. राम जोशी
क. होणाजी बाळा
ड. सगनभाऊ

बखर लेखनाचे ऐतिहासिक मूल्य कमी होण्यामागे कोणते कारणआहे?

अ. त्यात मराठ्यांचा इतिहास आला आहे
ब. मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास आला आहे
क. थोर, पराक्रमी राजांची चरित्रे सांगितलेली आहेत
ड. बखरींचे लेखन काल्पनिक, चमत्कृतिजन्य, अद्भुतरम्य पद्धतीने केलेले आहे

शाहिरी काव्यात कोणत्या रचनाप्रकारांचा समावेश होतो?

अ. ओवी-अभंग
ब. पोवाडा-लावणी
क. भारूड-आरती
ड. वृत्त-छंद

'गुरुचरित्र' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ. नृसिंह सरस्वती
ब. सरस्वती गंगाधर
क. गोरक्षनाथ
ड. एकनाथ

पोवाड्याची रचना कशाप्रकारची असते?

अ. पद्यात्म
ब. गद्यपद्यात्म
क. गद्यात्म
ड. कथनात्म

'हटातटाने पटा रंगवुनि जटा धरीशी का शिरी', ही उपदेशपर लावणी कोणी लिहिली आहे?

अ. परशराम
ब. प्रभाकर
क. अनंत फंदी
ड. राम जोशी

श्रीदत्ताबद्दलचा भक्तिभाव आणि गुरुचे महत्त्व खालीलपैकी कोणत्या ग्रंथात सांगितलेले आहे?

अ. गोरक्षगीता
ब. पासोडी
क. गुरुचरित्र
ड. दासबोध

'कर्णहसुगे' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ. बसवेश्वर
ब. शांतिलिंग
क. मन्मत
ड. शिवलिंग

नाथ पंथाचे अराद्य दैवत कोणते?

अ. विठ्ठल
ब. श्रीराम
क. दत्तात्रय
ड. शंकर

अनंत फंदी यांनी खालीलपैकी कोणता पोवाडा रचला आहे?

अ. खर्ड्याची लढाई
ब. तानाजी मालुसरेंवरील पोवाडा
क. दुसऱ्या बाजीरावाचा पोवाडा
ड. अफजलखानवधाचा पोवाडा

मुस्लिम धर्मियांनी मराठीत केलेल्या काव्यरचनेवर कोणत्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे?

अ. वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान
ब. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान
क. नाथ पंथाचे तत्त्वज्ञान
ड. दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान

नाथ पंथियाची पदरचना कोणत्या प्रदेशात अधिक लोकप्रिय आहे?

अ. उत्तरप्रदेश
ब. पश्चिम महाराष्ट्र
क. मध्यप्रदेश
ड. कर्नाटक

नाथ पंथ लोकप्रिय न होण्यामागे कोणते कारण आहे?

अ. महाराष्ट्रात फार प्रसार झाला नाही
ब. आचरण मार्ग अतिशय कठिण होता
क. ग्रंथलेखन फारसे उपलब्ध झाले नाही
ड. समाजात फार मिसळले नाहीत

ख्रिस्ती धर्मीय कवींनी काव्यनिर्मितीसाठी कोणते रचनाप्रकार स्वीकारले?

अ. वृत्त
ब. अभंग व ओवी
क. पोवाडा
ड. भारूड

'सभासदाची बखर' कोणी लिहिली आहे?

अ. भगवान दत्त
ब. रामजी तिरुमल
क. कृष्णाजी अनंत सभासद
ड. हनुमंतस्वामी

पेशवाईच्या स्थापनेपासून अस्तापर्यंतचा समग्र इतिहास खालीलपैकी कोणत्या बखरीत आलेला आहे?

अ भाऊसाहेबांची बखर
ब. पानिपतची बखर
क, पैशव्यांची बखर
ड. सभासदाची बखर

लिंगायत संप्रदायाची स्थापना कोणी केली?

अ. गोरक्षनाथ
ब. नृसिंह सरस्वती
क. बसवेश्वर
ड. रामदास

कवी दासोपंत यांनी लिहिलेला कोणता काव्यग्रंथ विशेष लोकप्रिय ठरला आहे?

अ. गीतार्णव
ब. पासोडी
क. पदार्णव
ड. गुरुचरित्र

बखर म्हणजे काय?

अ. पौराणिक कथा
ब. मराठ्यांचा इतिहास
क. इतिहासातील कौटुंबिक कथा
ड. प्राचीन इतिहास

शाहिर कवींना 'धीटकवी' कोणी म्हटले आहे?

अ. संत एकनाथ
ब. म. वा. धोंड
क. संत रामदास
ड. वि. का. राजवाडे

मध्ययुगात कोणत्या भक्ती पंथाने वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले?

अ. रामदासी संप्रदाय
ब. दत्त संप्रदाय
क. नाथ संप्रदाय
ड. लिंगायत संप्रदाय

लावणीतून प्रामुख्याने कोणत्या रसाचा आविष्कार होतो?

अ. हास्य
ब. करुण
क. शृंगार
ड. वीर

खालीलपैकी कोणता शाहिर कवी शृंगारिक लावण्यांसाठी प्रसिद्ध आहे?

अ. परशराम
ब. प्रभाकर
क. राम जोशी
ड. सगनभाऊ

'प्रीत पतंगाची खरी, झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी' अशी निरपेक्ष प्रेमाची भावना व्यक्त करणारी लावणी कोणी लिहिली आहे?

अ. होणाजी बाळा
ब. प्रभाकर
क. अनंत फंदी
ड. परशराम

लिंगायत संप्रदायाचे उपास्य दैवत कोणते आहे?

अ. प्रभू राम
ब. मारुती
क. शंकर
ड. श्रीदत्त

खालीलपैकी कोणत्या ग्रंथात भगवदगीतेवरील भाष्य आलेले आहे?

अ. सिद्धसंकेतप्रबोध
ब. अंबरहुसेनीटिका
क. पंचीकर्ण
ड. गुरुचरित्र

'ख्रिस्तपुराण' या ग्रंथावर कोणत्या संतकवीच्या लेखनाचा प्रभाव आहे?

अ. संत एकनाथ
ब. संत तुकाराम
क. संत ज्ञानेश्वर
ड. संत तुकाराम

नाथ पंथात किती नाथ मानले जातात?

अ. आठ
ब. नऊ
क. दहा
ड. पाच

गोरक्षनाथ हे कोणत्या पंथाचे प्रवर्तक आहेत?

अ. दत्त संप्रदाय
ब. नाथ संप्रदाय
क. महानुभाव संप्रदाय
ड. लिंगायत संप्रदाय

'रेशमाच्या रेघांनी, लाल काळ्या धाग्यांनी' ही लावणी कोणी लिहिली आहे?

अ. इंदिरा संत
ब. शांताबाई शेळके
क. ग. दि, माडगूळकर
ड. वसंत बापट

'अफजलखान वधाचा पोवाडा' कोणी लिहिला आहे?

अ. अग्निदास
ब. तुलसीदास
क. अनंत फंदी
ड. यानाजी

नाथ पंथ कोणत्या कारणामुळे सर्वसमावेशक पंथ ठरतो?

अ. तांत्रिक व अघोरी मार्गामुळे
ब. कर्मकांड व जातिव्यवस्था मानत नाही म्हणून
क. भक्तिकाव्याची निर्मिती केली आहे म्हणून
ड. संपूर्ण भारतभर पसरलेला पंथ आहे म्हणून

---